1 I011

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** वडुज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0119 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/03/2024 22:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 26/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/03/2024

**Time From (वेळेपासून):** 14:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/03/2024 **Time (वेळ):** 22:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 050

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/03/2024 22:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वडुज,खटाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**

(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संतोष शंकर इंगळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पेडगाव,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पेडगाव,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9881677592

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र राजाराम खलिपे | | | 1. पेडगाव रोड,वडुज,खटाव,वडुज ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50,000/रुपये लाच रक्कम स्विकारली आहे | 50,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No.<br>(अ.क्र.) | UIDB Number<br>(यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 26/03/2024

मी, संतोष शंकर इंगळे वय34 वर्षे, व्यवयास -आदर्श डेव्हलपर्स ,अर्थमुव्हर्स रा.पेडगाव ता खटाव जि सातारा मोबाईल नं.9881677592

मी आज दिनांक 26/03/2024 रोजी अँटी करप्शन ब्युरो, सातारा येथे फोन करुन पोलीस उपअधीक्षक श्री. राजेश वाघमारे साहेब यांचेशी फोनवरुन बोलणी करुन माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगितली. परंतु मला अँटी करप्शन ब्युरो,सातारा कार्यालयात येण्यास जमणार नाही. तरी तुम्हीच वडुज ता खटाव जि सातारा येथे येवुन माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी ही विनंती मी श्री. वाघमारे साहेब यांना केली. त्यावर पोलीस उपअधीक्षक,श्री वाघमारे साहेब यांनी सांगितले की, त्यांचेकडील नेमणुकीचे पोलीस निरीक्षक श्री. सचिन राऊत हे तुमच्या तक्रारीवर कारवाई करतील. त्यानुसार पो.नि.राऊत यांनी माझ्याशी संपर्क साधला व मला कारवाई बाबतचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले.

त्या नियोजनानुसार दिनांक 26/03/2024 रोजी 11.45 वाचे सुमारास पोलीस निरीक्षक श्री.राऊत अँन्टी करप्शन ब्युरो,सातारा हे त्यांचे सहका-यासह शासकीय वाहनाने वडुज येथिल वेद मंगल कार्यालय येथे येवुन पोहोचले. तेव्हा पो.नि.राऊत यांनी माझी ओळख करुन घेवुन त्यांचे सह असणा-या दोन पंचांची व इतर सहका-यांची आम्हाला एकमेकांना ओळख करुन दिली. तेव्हा मी त्यांना उपविभागीय अभियंता,जि.प.बांधकाम,उपविभाग ,वडुज कार्यालयातील लोकसेवक श्री.खलिपे साहेब हे माझ्या आदर्श फर्मच्या वतीने पंचायत समितीचे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या तीन रस्त्यांचे खडीकरण व मुरुमीकरण केलेल्या कामाचे व एक गांडुळ खत निर्मिती शेडचे असे एकुण चार कामाचे काम पुर्ण केल्याचा दाखला देणेकरीता लाचेची मागणी करीत असले बाबतची तक्रार पंचां समक्ष पो.नि. राऊत यांना सांगितली. व माझी हाताने लिहिलेली तक्रार पो.नि. राऊत यांना दिली असता पो. नि.राऊत व पंचांनी ती वाचुन बघितली व त्यावर त्यांनी व दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व प्रक्रिया समजावुन सांगितली. त्यानुसार पो.नि.राऊत यांनी पंचा समक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व माझ्या शर्टच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन लावुन दिले. वेद मंगल कार्यालय,वडुज येथुन 12.50 वाचे सुमारास मी व पंच नं.1 संदिप मोहिते असे आम्ही दोघे मी आणलेल्या होंडा शाईन मोटार सायकल क्रमांक MH 11CC 7984 वरुन उपविभागीय अभियंता, जि.प.बांधकाम,उपविभाग,वडुज येथे श्री खलिपे साहेब यांची भेट घेणे कामी रवाना झालो. त्यावेळी पो.नि.राऊत व त्यांचे सहकारी त्यांचे वाहनात तिथेच थांवुन राहिले होते.

मी व पंच असे उपविभागीय अभियंता, जि.प.बांधकाम उपविभाग,वडुज येथे पोहोचलो. त्यावेळी श्री खलिपे साहेब हे त्यांचे केबिन मध्ये बसलेले होते. मी माझ्या कामा संदर्भाने बोलणी केली या बोलणी दरम्यान खलिपे साहेब यांनी शिक्के मारुन आणले का असे विचारले व त्या मँडम कडुन शिक्के घ्या व त्यांना 2,000/- रुपये द्या असे म्हणाले त्यानंतर त्यांचेत व माझेत चर्चा चालु असताना मी 34 लाख रुपया च्या बिलाच्या दोन टक्क्यांनी 68,000/- रु होतात. असे म्हणुन मी त्यांना पहिलेच काम आहे करा काहीतरी थोडे फार कमी. सांगा की 50 करु का ? असे म्हणालो. तेव्हा लोकसेवक खलिपे मला करा करा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना अर्ध्या तासात घेवुन येतो . 50 हजार हं, असे म्हणालो तेव्हा खलिपे साहेब यांनी मला हो हो करा काय अडचण नाय असे म्हणुन मी पुर्ण केलेल्या कामाचा दाखला देणे करीता माझे झालेल्या कामाच्या एकुण बिलाच्या 34 लाख रुपयाच्या दोन टक्के प्रमाणे 68,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती त्यांनी माझ्याकडुन 50,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवली. व लाचेची रक्कम लागलीच देणेची सांगितली . या दरम्यान पंच नं.1 मोहीते हे तेथे जवळ थांबुन होते.

त्यानंतर आम्ही परत पो.नि.राऊत व त्यांचे सहकारी थांबले ठिकाणी 13.40 वाचे सुमारास आलो. मी पो.नि. राऊत यांना घडलेली हकीकत सांगितली. पो.नि.राऊत व पंचांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर मधिल रेकॉर्ड

झालेले संभाषण ऐकले त्यामध्ये उपविभागीय अभियंता, कार्यालयातील खलिपे साहेब हे लाचेची मागणी करीत आहेत किंवा कसे ? त्यामध्ये रेकॉर्डिंग मध्ये खलिपे साहेब हे लाचेची मागणी करीत असल्याची पो. नि. राऊत व पंचांची खात्री झाल्याने पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय पो.नि. राऊत व पंचांनी घेतला .

त्यानुसार लागलीच पो.नि.राऊत यांनी मला व पंचांना सापळा कारवाईची माहिती थोडक्यात समजावुन सांगितली. वेळेच्या अभावी पडताळणी पंचनामा तसेच संभाषण स्क्रिप्ट नंतर टाईप करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर मी पो.नि.राऊत यांचे सांगणेवरुन माझ्याकडे असलेली 50,000/- रुपये लाचेची रक्कम म्हणुन पंचा समक्ष हजर केली. त्यानुसार पो.नि. राऊत यांचे सहका-यांनी मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेतले. त्यावर पो.नि.राऊत व दोन्ही पंचांनी सह्या केल्या. त्यानंतर पो.नि.राऊत यांनी अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म मला व पंचांना समजावुन सांगुन सापळा पुर्व व सापळा कारवाईची माहिती सांगितली. त्यानुसार पो.नि.राऊत व त्यांच्या सहकार्यांनी पंचा समक्ष सापळा पुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण केली. अँथ्रासिन पावडर लावली लाचेची रक्कम माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवली. खलिपे साहेब यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर डाव्या हाताने डोक्यावरुन दोनदा हात फिरवुन ईशारा करण्याच्या सुचना पो.नि.राऊत यांनी मला दिल्या.

त्यानंतर मी व पंच नं.1 संदिप मोहीते असे पुन्हा माझ्या मोटार सायकल वरुन उपविभागीय अभियंता,जि.प. बांधकाम उपविभाग,वडुज येथे जाणे करीता 14.12 वाचे सुमारास रवाना झालो. सापळा पथक आमचे पाठीमागुन येवु लागले. मी उपविभागीय अभियंता, जि.प.बांधकाम, उपविभाग,वडुज या कार्यालयात गेलेनंतर खलिपे साहेब यांची भेट घेतली. मी त्यांना ठरल्याप्रमाणे पैसे आणल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यांना माझ्या पॅन्टच्या खिशातुन पैसे काढुन त्यांचेसमोर धरले तेव्हा खलिपे साहेब यांनी ते पैसे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे टेबल वरती असलेल्या निळ्या रंगाच्या बॅगेमध्ये ठेवले. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा पद्धतीने लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्व नियोजित ईशारा केला असता, पो.नि.राऊत व त्यांचे सहका-यांनी येवुन खलिपे यांना लाचेच्या रक्कमेसह 14.40 वाचे सुमारास त्यांचे केबिन मध्ये ताब्यात घेतले. तसेच माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन पो.नि.राऊत यांनी त्यांचे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि.राऊत यांनी पंचा समक्ष सापळा कारवाई दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण सापळा पंचनाम्याची पुढील कारवाई शासकीय विश्रामगृह, वडुज येथे करण्याचे निश्चित केले.

तरी दिनांक 26/03/2024 रोजी लोकसेवक जितेंद्र राजाराम खलिपे वय51 वर्षे पद उपविभागीय अभियंता ,जि. प.बांधकाम उपविभाग, वडुज वर्ग -1 सध्या रा.पेडगाव रोड, वडुज ता खटाव जि सातारा मुळ रा.जैन मंदिराजवळ, उभीपेट,विटा ता खानापुर जि सांगली यांनी माझे आदर्श अर्थमुव्हर्स व डेव्हलपर्स या फर्मच्या वतीने पंचायत समितीचे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या एकुण तीन रस्त्यांचे खडीकरण व मुरुमीकरण करण्याचे काम व गांडुळ खत निर्मीती शेडचे एक काम असे एकुण चार कामांचा पुर्ण केल्याचा दाखला देणे करीता एकुण 34लाख रुपये बिलाच्या दोन टक्के प्रमाणे 68,000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 50,000/-रुपये लाच मागणी केली. तसेच त्यांचे कार्यालयातील मॅडम यांचेकडुन शिक्के मारुन घेवुन त्यांना दोन हजार रुपये देण्यास सांगुन त्यांनी 50,000/-रुपये लाच रक्कम त्यांचे उपविभागीय अभियंता,जि.प.बाधकाम उपविभाग, वडुज कार्यालयातील त्यांचे केबिनमध्ये14.40वाचे सुमारास स्व:ता स्विकारुन त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन वैध परिश्रमिकाशिवाय अन्य पारितोषण, प्रलोभन, बक्षिस म्हणुन आर्थिक फायदा मिळवला. तसेच तक्रारदार यांना कार्यालयातील मॅडम यांना पैसे देण्यास सांगुन प्रोत्साहन दिले. म्हणुन त्यांचेविरुद्ध माझी कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक जितेंद्र राजाराम खलिपे,उपविभागीय अभियंता,जि.प.बांधकाम उपविभाग,वडुज यांचेशी कसलेशी वैयक्तीक वैर नसुन माझा त्यांचेशी कसलाही पैशाचा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही .

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठी मध्ये टंकलिखित करण्यात आला असुन तो बरोबर असल्याचा खात्री करुन मी त्यावर सही केली आहे.

समक्ष हा जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ghanshyam Babasaheb Sonawane(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ghanshyam Babasal
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

ठाणे अंमलदार
वडूज पोलिस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**